# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. संकीर्ण 2020/प्र.क्र. 140/एसडी-6 दि. 10 नोव्हेंबर 2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 21 नोव्हेंबर 2020.
6. महाराष्ट्र शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. संकीर्ण 2020/प्र.क्र. 204/एसडी-6 दि. 18 जानेवारी 2021.
7. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 22 जानेवारी 2021.
8. श्री. राहुल नाईकवाडे व इतर सर्व कोचिंग क्लासेस संघटनेचे संचालक यांचे निवेदन दि. 18.01.2021.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांक:- 27/01/2021.

**विषय:-** उस्मानाबाद जिल्ह्यातील खाजगी शिकवणी वर्ग/कोचिंग क्लासेस सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने “महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020” प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 चे अनुषंगाने संदर्भ क्र. 5 च्या या कार्यालयाच्या आदेशान्वये जिल्ह्यातील इयत्ता 9 वी ते इयत्ता 12 वी चे वर्ग दिनांक 23 नोव्हेंबर 2020 पासून व संदर्भ क्र. 6 चे अनुषंगाने संदर्भ क्र. 7 अन्वये जिल्ह्यातील इयत्ता 5 वी ते इयत्ता 8 वी चे वर्ग दिनांक 27 जानेवारी 2021 पासून सुरु करण्यास मान्यता दिलेली असून त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. ज्याअर्थी संदर्भ क्र. 8 अन्वये कोविड-19 चे प्रतिबंधात्मक उपाययोजना व सोशल डिस्टंन्सिंगचे पालन करण्याच्या अटीवर जिल्ह्यातील कोचिंग क्लासेस सुरु करण्यास परवानगी देणेबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील इयत्ता 5 वी ते इयत्ता 12 वी चे खाजगी शिकवणी वर्ग/कोचिंग क्लासेस दि. 27 जानेवारी 2021 पासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तीचे पालन करण्याच्या अटीवर परवानगी देत आहे.



Scanned by CamScanner

1. जिल्ह्यातील इयत्ता 5 वी ते इयत्ता 12 वी चे खाजगी शिकवणी वर्ग/कोचिंग क्लासेस दि. 27 जानेवारी 2021 पासून सुरु करण्यास परवानगी राहील.

2. जिल्ह्यातील इयत्ता 5 वी ते 12 वी च्या शाळा सुरु करणेबाबत उपरोक्त संदर्भ क्र. 4 व 6 मध्ये नमूद शासन निर्णयामध्ये ज्या अटी व शर्ती निश्चित करण्यात आलेल्या आहेत त्या सर्व अटी व शर्ती खाजगी शिकवणी वर्ग/कोचिंग क्लासेस यांनाही लागू राहतील व त्यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

3. एका शिकवणी वर्गामध्ये/खोलीमध्ये सामाजिक अंतराचे पालन करण्याच्या अटीवर कमाल 40 विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत परवानगी राहील. (विहित सामाजिक अंतर पाळून वर्गामध्ये जर 40 पेक्षा कमी विद्यार्थी बसू शकत असल्यास तेवढ्याच विद्यार्थ्यांना वर्गामध्ये बसविण्याची परवानगी राहील.)

4. कोचिंग क्लासेसच्या इमारतीमधील सर्व शिकवणी वर्गांचे/खोल्यांचे संपूर्ण निर्जंतुकीकरण करावे व सोबतच सॅनिटायझर लिक्वीड मशीन उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

5. कोचिंग क्लासेस/हॉलमध्ये विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेत किमान 6 फूट अंतर असेल अशा पद्धतीने एका बाकावर एक विद्यार्थी या पद्धतीने बैठकव्यवस्था करण्यात यावी.

6. विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवहीत दररोज अद्यावत करावी. यदा कदाचित संशयित रुग्ण आढळल्यास कॉन्टॅक्ट ट्रेसिंग (Contact Tracing) करणे सोयीचे होईल.

7. कोविड-19 संसर्गजन्य आजार रोखण्याकरिता शासनाने निर्गमित केलेल्या सर्व निर्देशांचे पालन करणे अनिवार्य राहील.

8. कोचिंग क्लासेस सुरु करण्यापूर्वी तेथील सर्व प्रशिक्षक, व्यवस्थापक व कर्मचारी यांची कोविड-19 ची चाचणी (RTPCR) करुन घेणे अनिवार्य राहील.

9. कोचिंग क्लासेस मध्ये विद्यार्थी, प्रशिक्षक, व्यवस्थापक व इतर कर्मचारी यांनी नेहमी मास्क वापरणे, थर्मल गन व पल्स ऑक्सीमिटरद्वारे तपासणी करणे, सामाजिक अंतराचे पालन करणे, सॅनिटायजरचा वापर, निर्जंतूकीकरण करणे अनिवार्य आहे.

10. शिकवणी वर्ग/कोचिंग क्लासेस बाबत राज्य शासनाकडून आदेश/नियमावली निर्गमित झाल्यास त्याचे पालन करणे बंधनकारक राहील.

11. ताप, श्वसनास त्रास, डोकेदुखी इ. कोविड-19 ची लक्षणे असलेल्या विद्यार्थ्यांना वर्गामध्ये प्रवेश न देता त्यांना त्यांची आरोग्य तपासणी करणेबाबत सूचित करण्यात यावे.

12. सदरची परवानगी ही जिल्ह्यातील प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zones) मध्ये लागू असणार नाही.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 ते 60, महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम 2020 चे नियम 11, साथरोग अधिनियम 1897 तसेच भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 व इतर लागू होणा-या कायदेशीर तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश आज दि. 27/01/2021 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी देण्यात आला आहे.

(कौस्तुभ दिवेगांवकर)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद



Scanned by CamScanner

प्रत:- 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
6. शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), जि. प. उस्मानाबाद.
7. विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.
8. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
9. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
10. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
12. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
13. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
14. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
15. श्री. राहुल नाईकवाडे व इतर सर्व कोचिंग क्लासेस संघटनेचे संचालक उस्मानाबाद.
16. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner